## सौ. विमलाबाई गरवारे यांना ११४ व्या जयंतीनिमित्त अभिवादन

कै. सौ. विमलाबाई गरवारे यांच्या जयंतीनिमित्त आज गरवारे ट्रस्टचे संचालक व म .ए. सो. च्या नियामक मंडळाचे सदस्य मा. श्री. सुनील सुतवणे यांच्या हस्ते म. ए. सो. सौ. विमलाबाई गरवारे प्रशालेतील त्यांच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्पाहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. या प्रसंगी म. ए. सो. च्या आजीव सदस्य मंडळाचे सदस्य डॉ. निर्भय पिंपळे, प्रशालेचे मुख्याध्यापक रोहिदास भारमळ, उपमुख्याध्यापिका सौ. श्रद्धा खिरीड, पर्यवेक्षिका सौ. जयश्री शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रथेप्रमाणे म. ए. सो. आबासाहेब गरवारे महाविद्यालयातील कै. आबासाहेब गरवारे यांच्या अर्धाकृती पुतळ्यास देखील पुष्पाहार वाहून आदरांजली अर्पण करण्यात आली. या प्रसंगी मा. श्री. सुनील सुतवणे, म. ए. सो. चे सचिव डॉ. अतुल कुलकर्णी, सहाय्यक सचिव सुधीर भोसले, म. ए. सो. आबासाहेब गरवारे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास उगले, म. ए. सो. गरवारे कॉलेज ऑफ कॉमर्सचे प्राचार्य डॉ. किशोर देसरडा, आणि म. ए. सो. चे मुख्य कार्यकारी अधिकारी सचिन आंबर्डेकर उपस्थित होते.





